महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ शनिवार, ९ मे २०१५

चौथी भिंत

# एक तातडीचा प्रश्न

## एफ १/१०५

■ जयंत पवार

गोष्ट साधी आहे आणि नाहीही. आपल्या सर्वसमावेशक, बहुविध संस्कृतीत छोट्या छोट्या गोष्टी आपल्याला खुपू लागल्या आहेत. कोणी काय खावं, काय ल्यावं, कसं दिसावं याचे निकष आपण आपल्या नकळत ठरवून लेबलिंग करू लागलो आहोत आणि आपल्यात भिंती उभारू लागलो आहोत. नाटककार आशुतोष पोतदार 'एफ १/१०५' या आपल्या नाटकातून ही साधी गोष्ट सरळ साध्या पद्धतीने सांगत नाहीत, कारण त्यांना ती साधी वाटतच नाही. ते 'रंग' हा विषय घेतात आणि भिंतीला फासण्याच्या रंगातून उद्भवणाऱ्या वादापासून माणसांच्या आत तयार होणाऱ्या उग्र रंगापर्यंत त्याचा आलेख रेखतात. एका तातडीच्या प्रश्नाला भिडत आपल्या भोवतालच्या समाजवास्तवावरच हे नाटक भाष्य करत असल्यामुळे त्यातून एक समकालीन राजकीय विधान जन्म घेतं पण नाटकाच्या प्रयोगशैलीमुळे आणि विषयातील अॅब्सर्डिटीवर जरा ज्यादा भर दिल्यामुळे त्यातली भेदकता काहिशी उणावते.

श्रीराम श्रेयस को ऑ. हाऊसिंग सोसायटीत राहणाऱ्या एका जोडप्याने आपल्या फ्लॅटला कोणता रंग द्यायचा हा एरवी त्यांचा व्यक्तिगत मामला ठरला असता, पण तो हिरवा रंग असल्याने एक बारीक प्रश्न उपस्थित झालाय, आणि तो बघता बघता व्यापक बनलाय. घरी रंग काढायला आलेल्या डॉन पेंटरने 'ग्रीन कलर चलता है आपको?' एवढाच प्रश्न खरंतर विचारला आहे. पण हा प्रश्न त्याच्या मनात आलाच कसा, या विचाराने मृण्मयी हैराण होते. हिंदू लोक घराला हिरवा रंग कसा देतील, असं त्याला विचारायचं असावं ही शंका तिच्या मनात जन्म घेते आणि मग त्याची नजरही तिला संशयास्पद वाटू



अन्नसंस्कृतीच्या वैविध्याची त्याला सखोल जाण असणं यातली सूचकताही दाद देण्यासारखी आहे. रंग, रूप, स्पर्श,गंध आणि चव या भावात्मक, संकल्पनात्मक गोष्टीही कशा अस्मितांच्या जाणिवेत रूपांतरित होतात, हे लेखक तरलपणे सांगून जातो. पण या गोष्टीच्या मूळाशी आणि अंतिम परिणामापाशी जी दाहकता आहे ती अस्वस्थतेत परावर्तीत होत नाही.

याचं एक उघड कारण प्रयोगशैलीत सापडू शकतं. दिग्दर्शक मोहित टाकळकर यांनी सोसायटीच्या सभासदांचा जो कोरस वापरलाय त्याचा एकूणच बाज अर्कचित्रात्मक आहे. पण या अर्कचित्रात्मकतेची मर्यादा अभिनयात अनेकदा ओलांडली जाते आणि विदूषकी चाळे जास्त होतात. यातून विनोदनिर्मिती होते पण त्यातल्या विधानांची हानी होते. अर्थात लेखनातही सागर-मृण्मयी, डॉन-मृण्मयी, डॉनचं स्वगत, मोलकरीण राधा-मृण्मयी हे प्रसंग आशुतोष पोतदारांनी त्यातली सूचकता आणि तरलता जपत लिहिले आहेत तसे कोरसचे प्रसंग लिहिले गेलेले नाहीत. ते शेरेबाजी करणारे आणि एका सांकेतिक पद्धतीने साकार झालेले आहेत. कोरस एका सपाटपणे व्यक्त होतो, त्यातले अनेक चेहरे आपापल्या वैशिष्ट्यांनिशी समोर येत नाहीत, त्यामुळे त्यातल्या रंगछटा जाणवत नाहीत. एकूण प्रयोगात रेखीवपणा आणि अभिनयातही सफाई असली तरी कलाकारांना सपाटपणा पुसून टाकण्यासाठी ज्यादा अंग वउच्चारविक्षेप करावे लागतात की काय असं वाटतं. मृण्मयी गेडबोले, सागर देशमुख आणि राजकुमार तांगडे (डॉन) यांनी नाटकाचा आतला सूर बरोबर पकडला आहे. तृप्ती खामकरने वेगवेगळ्या स्त्री भूमिकांतला फरक संवादोच्चारणातील अवाजवी पट्टीने दाखवल्यामुळे अनेकजागी तो बटबटीत होतो. अर्थात तिचा वावर लक्षणीय आहे.

प्रदीप वैद्यची प्रकाश योजना आणि मोहित टाकळकरची नेपथ्य संकल्पना यांचं विशेष मेतकूट असावं. अनेक नाटकांत ते खमंग होतं. मोहितने नेपथ्यात केवळ एकदोन वस्तूंचाच वापर करत अवकाश भरून टाकण्याचं आणि सायक्लोरामावर कल्पक व्हिज्युअल्स दाखवत समोर चालणाऱ्या हालचालींना वेगळाच दृश्यात्मक अर्थ देण्याचं कौशल्य या प्रयोगातही दाखवलंय. प्रदीप वैद्यच्या प्रकाश योजनेतून रंगमंचावरच्या पात्रांच्या पडछायाही नेपथ्यासारख्या काम करू लागतात. त्यामुळे हे नाटक डोळ्यांनाही एक वेगळा अनुभव देतं.

jayant.pawar@timesgroup.com

सोसायटीसाठी ती जपू पाहात असलेल्या तथाकथित भारतीय संस्कृतीत बिघाड आणणारी गोष्ट ठरते आणि उत्तरेकडून महाराष्ट्रात पोटापाण्यासाठी आलेला डॉन पेंटर समाजासाठी कायम आरोपीच्या पिंजऱ्यात जखडला जातो. वास्तविक सागर आणि मृण्मयी हे जोडपं मुक्त आणि उदारमतवादी विचारांचं आहे. पण माणसांच्या मनात हेतूंविषयी शंका आहे आणि या शंकेच्या आड हिंसा दबा धरून बसली आहे. घरातली मोलकरीण सतत झुरळं मारते, ही सूचक कृती सोसायटीचे लोक डॉन पेंटरला बदडतात तिथवर संक्रमित होते तेव्हा अर्थाचं एक वलय पूर्ण करते. उत्तरेकडचे बाप्ये नसतातच चांगले, हे तिचं प्रतिपादनही सोसायटीचे सभासद डॉनच्या परप्रांतीय असण्याचा मुद्दा उचलत (काठीसेनेला फोन लाव) त्याने हिरवा रंग आणि गणपतीचा केलेला एकत्रित उचार आक्षेपार्ह ठरवतात तेव्हा अजिबात निरुपद्रवी राहात नाही. या सभासद समुदायाचा एकूणच आवाज सदैव वरच्या पट्टीतला आहे. त्यात कायम अभिनिवेश आहे. यात जशी खालच्या वर्गातल्या उपद्रवमूल्य नसलेल्या डॉनची गळचेपी होते तशीच बहुविधतेचा आदर राखत स्वतःचं स्वातंत्र्य अबाधित राखणाऱ्या सागर, मृण्मयी सारख्या माणसांचीही कोंडी होते. त्यांना त्यांचे निर्णय घेण्याचा हक्क राहात नाही. छोटासा व्यक्तिगत निर्णयही सामाजिक अशांततेचा मुद्दा बनू शकते.

'एफ १/१०५'चं हे कथासूत्र आणि त्यातून निघणारी आशयसूत्रं आपल्याला स्वतःकडे पाहायला लावतात. आशुतोष पोतदार यांनी आजच्या सामाजिक परिस्थितीवर नेमकेपणाने बोट ठेवताना कधी थेट तर कधी सूचकपणे बेलणं पसंत केलंय. 'आता नवं सरकार आलंय...सगळ्यांबद्दल एम्पथी पाहिजे', असं लोक बोलतात; 'भगवा रंग एस्टॅब्लिशमेंटचा..निळा रंग कसा असायला पाहिजे? मायावी!' अशीही थेट शेरेबाजी करतात पण हिरवा रंग मुस्लिम असण्याचा संकेत देतो, हे थेट सांगत नाही. ते हिंदूंच्या मनात आहे आणि (मुस्लिम असू शकणारा) डॉन कायम संशयाच्या पिंजऱ्यात आहे, हे सुचवतात. अर्थात ही सूचकता देखील पुरेशी स्पष्ट आहे. सागरचं शेफ असणं,